Bharat Temples

# श्री गणेश स्तवन

घोर हा नको फार कष्टलों ॥ निजहितास मी व्यर्थ गुंतलों ॥
वारिं शीघ्र ही संसारयातना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ १ ॥
विषय गोड हे लागले मला ॥ यामुळें असे घात आपुला ॥
कळुनियां असे भ्रांति जाइना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ २ ॥
त्रिविध ताप हा जाळितो अती ॥ काम क्रोध हे जाण पीडिती ॥
चित्त सर्वथा स्वस्थ राहिना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ ३ ॥
स्त्रीधनादि हें आठवीं मनीं ॥ छंद हाचि रे दिवसयामिनीं ॥
विसरलों तुला दीनपालना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ ४ ॥
माउली पिता बंधु सोयरा ॥ तूंचि आमुचा निश्र्चयें खरा ॥
शरण तूज मी विघ्नभंजना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ ५ ॥
म्हणवितों तुझा दास या जनीं ॥ सकळ व्यापका जाणशी मनीं ॥
भुक्ति मुक्ति दे भक्तपालना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ ६ ॥
काय काय रे साधने करुं ॥ मी असें तुझें मूर्ख लेंकरुं ॥
विटंबिती मला द्वैतभावना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ ७ ॥
विषयचिंतनें शोक पावलों ॥ देहबुद्धिनें व्यर्थ नाडलों ॥
भालचंद्रजी तोडि बंधना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ ८ ॥
गजमुखा तुझी वाट पाहतां ॥ नेत्र शीणले जाण तत्वतां ॥
भेटसी कधीं भ्रमनिवारणा ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ ९ ॥
प्रभु समर्थ तूं आमुचे शिरीं ॥ वेष्टिलों असें विषय पामरीं ॥
नवल हेंचि रे वाटतें मना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ १० ॥
अगुण अद्वया तूं परात्परा ॥ पार नेणवे विधिहरीहरां ॥
अचल निर्मळा नित्य निर्गुणा ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥ ११ ॥
जिवन व्यर्थ हें तूजवेगळें ॥ स्वहित आपुलें काय साधिलें ॥

सुख नसे सदा मोह यातना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥१२ ॥
फारसें मला बोलतां न ये ॥ पाउलें तुझीं देखिलीं स्वयें ॥
मांडिली असे बहुत वल्गना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥१३ ॥
दीनबंधु हें ब्रीद आपुलें ॥ साच तूं करीं दाविं पाउलें ॥
मंगलालया विश्र्वजीवना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥१४ ॥
नाशिवंत रे सर्व संपदा ॥ हें नको मला पाव एकदां ॥
क्षेम देउनी चित्तरंजना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥१५ ॥
जातसे घडी पलयुगापरी ॥ लागली तुझी खंति अंतरीं ॥
स्वामि आपुला विरह साहिना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥१६ ॥
कळेल तें करीं विनवणें किती ॥ तारिं अथवा मारिं गणपती ॥
सकल दोष संकष्टनाशना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥१७ ॥
आवडे मला त्रिभुवनाकृती ॥ पूजुनी वरी करिन आरती ॥
धांव पाव रे मोदकाशना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥१८ ॥
ह्रदय कठिण तूं न करिं सर्वथा ॥ अंत आमुचा पाहसि पूरता ॥
सिद्धिवल्लभा मुषकवाहना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥१९ ॥
कल्पवृक्ष तूं कामधेनु वा ॥ लाविजे स्तनीं जीविंच्या जिवा ॥
हाचि हेत रे शेषभूषणा ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥२० ॥
तारिं मोरया दुःखसागरीं ॥ गोसाविनंदन प्रार्थना करी ॥
आत्मया मनीं जाण चिद्घना ॥ हे दयानिधे श्री गजानना ॥२१ ॥
प्रारंभीं विनती करुं गणपती विद्यादयासागरा ॥
अज्ञानत्व हरोनि बुद्धि मति दे आराध्य मोरेश्र्वरा ॥
चिंता क्लेश दरिद्र दुःख अवघें देशांतरा पाठवीं ॥
हेरंबा गणनायका गजमुखा भक्तां बहू तोषवीं ॥२२ ॥
॥ इति गोसाविनंदन विरचितं श्री गणेश स्तवन संपूर्ण ॥

Source: [https://www.bharattemples.com/shri-ganesh-satvan/](https://www.bharattemples.com/shri-ganesh-satvan/)

Bharat Temples

Complete Bhajans Collections - Download Free Android App
https://play.google.com/store/apps/details?id=com.numetive.bhajans

Facebook: https://www.facebook.com/bharattemples/
Telegram: https://t.me/bharattemples
Youtube: https://www.youtube.com/channel/UC24oJCxZJyhhKzSUD-Lt9Tw